ARTHA
(Fortnightly)
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80, Licence No. 175

वर्ष १८ | पुणे, बुधवार, १८ ऑक्टोबर, १९७२ | अंक १०

## तुमच्या मुलीचे लग्न ही काही बाहुला बाहुलीच्या लग्नाइतकी सोपी गोष्ट नाही...



## पण आमच्या आवर्तक ठेव योजनेमुळे ती सोपी होते...

तुमच्या मुलीच्या लग्नासाठी आवश्यक तेवढा पैसा आमच्या ह्या आवर्तक ठेव योजनेमुळं खात्रीनं उपलब्ध होतो. दर महिन्याला ठराविक रकमेची बचत करा. तुमची बचत सतत वाढतच जाईल आणि ज्या वेळी तो मंगल दिवस उगवेल त्यावेळी तुम्हाला जाणवेल ... आपण किती सुखी आहोत ... पैशाची तर चिंताच नाही.

**दर महिन्याला बँकेत ठेवायची रक्कम रु. ५ किंवा त्याच्या पटीत**
**मुदत : १ ते १० वर्षे**
**व्याज : ७ टक्क्यांपर्यंत**

**अधिक तपशीलासाठी आमच्या कोणत्याही शाखेला भेट द्या.**

**बँक ऑफ महाराष्ट्र**
हेड ऑफिस : ११७७ बुधवार पेठ, पुणे २.

2216 Mar

### कै. लक्ष्मणराव किर्लोस्करांच्या जीवनावरील अनुबोधपट

कै. लक्ष्मणराव किर्लोस्कर यांच्या जीवनावरील अनुबोधपटाचे नाव 'दि मॅन बिहाअिंड दि प्लाऊ' असे असून सुप्रसिद्ध चित्रपट दिग्दर्शक राम गबाले यांनी तो दिग्दर्शित केला आहे. या अनुबोधपटाची प्रत सिटिझन्स सेंटेनरी कमिटीने भारत सरकारच्या फिल्म्स डिव्हिजनच्या विनंतीनुसार फिल्म्स डिव्हिजनला भेटीदाखल दिली असून ऑक्टोबरात पुण्यातील सर्व चित्रपट-गृहांतून तो दाखविण्यात येईल.

या अनुबोधपटामध्ये कै. लक्ष्मणराव किर्लोस्करांच्या आजच्या औद्योगिक, सांस्कृतिक आणि सामाजिक विचारसरणीतील द्रष्टेपणा दिसून येतो. अस्पृश्यता बंदी, स्वातंत्र्य चळवळी, प्रभातफेऱ्या, राष्ट्रीय एकात्मता, हरितक्रांती, इ. विषयी त्यांच्या मनात असलेली आस्था आणि त्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न या चित्रपटात चित्रित करण्यात आले आहेत. लक्ष्मणरावांच्या जन्मभूमी आणि कर्मभूमीशी निगडित अशा गुर्लहोसूर, किर्लोस्करवाडी, औंध, हरिहर, बंगलोर, पुणे, देवास, गोवा, मुंबई अशा अनेक ठिकाणी या अनुबोधपटाचे चित्रण करण्यात आल्यामुळे २१ मिनिटांचा हा अनुबोधपट प्रेक्षकाला एका वेगळ्या विश्वात नेऊन सोडतो. चाळीशीनंतरच्या कै. लक्ष्मणरावांची भूमिका श्री. प्रभाकरपंत किर्लोस्करांनी केलेली आहे.

---

### वैकुंठ मेहता इन्स्टिट्यूट पुण्यातच राहणार

वैकुंठ मेहता इन्स्टिट्यूट फॉर को-ऑप. मॅनेजमेंट ह्या संस्थेचे पुण्याहून दिल्ली येथे स्थलांतर करण्यासंबंधात काही हालचाली चालू होत्या. महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या संचालक मंडळाने ह्या संदर्भात एक खास ठराव करून केंद्र शासनाला प्रस्तुत संस्था पुण्याहून न हलविण्यासंबंधीची विनंती केली. या संस्थेच्या दृष्टीने पुणे हेच योग्य व आदर्श ठिकाण होय, असेही ठरावात निःसंदिग्धपणे म्हटले होते; महाराष्ट्रातील अन्य सहकारी संस्था व प्रमुख सहकारी कार्यकर्त्यांनीही ह्या हालचालींबद्दल तीव्र नापसंती व्यक्त केली होती.

ह्या प्रश्नाचा काळजीपूर्वक व सर्वांगीण विचार केल्यानंतर केंद्र शासनाने ही संस्था पुण्यातच चालू राहावी अशा तऱ्हेचा निर्णय घेतला असल्याचे खात्रीलायकपणे समजते.

---

### आत्महत्यांच्या संख्येत सालोसाल वाढ

१९६५ पासून आत्महत्यांची संख्या वाढत चालली आहे. १९७० मध्ये भारतात एकूण ४८,४२८ अनैसर्गिक मृत्यूंची नोंद झाली, त्यांपैकी १४.९% आत्महत्यांचे कारण पति-पत्नींमधील वैमनस्य हे होते. (१९६९ मध्ये एकूण ४३,६३३ लोकांनी आत्महत्या केली होती.) भयानक रोगांना कंटाळून १४.१% लोकांची आत्महत्या होती; इतर कारणे अशी :—प्रेमभंग : ३.२%, दारिद्र्य : ४.२%, वेड : २.३%, अपेक्षाभंग : २.३%, परीक्षेत अपयश : ३.६% आणि मालमत्तेबद्दल तंटे : १.६%.


सरदारगृह

मुंबईत राहण्याची व भोजनाची उत्तम सोय.

मंगलकार्ये व मेजवान्या यांसाठी सोईस्कर ठिकाण.

♣

— आमची वैशिष्ट्ये —

* हीरकोत्सवानिमित्त अद्ययावत पद्धतीचे भोजनगृह व अनेक प्रकारच्या सुखसोई.
* टिळक जन्मशताब्दीदिनी लोकमान्यांचे सरदारगृहात केलेले स्मारक.

♣

फोन नं. :-३९३३७ ] सरदारगृह प्रा. लि. [ तार—सरदारगृह

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.





बँकेच्या धनवर्धिनी ठेव योजनेतील एक योजना

निवृत्ती वेतन (पेन्शन) योजना

डॉक्टर, व्यापारी, दुकानदार, कारागीर, फोटोग्राफर

असे आपण कोणतेही व्यावसायिक असा

निवृत्ती वेतनाची आपली सोय ही बँक करते.

दि युनायटेड वेस्टर्न बँक लि.

स्थापना १९३६ | मुख्य कार्यालय सिस्पुरे निकेतन, राजपथ सातारा. | शेड्यूल्ड बँक

महाराष्ट्रात सर्वत्र शाखा

☆ अर्थ ☆

बुधवार, १८ ऑक्टोबर, १९७२



संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे

“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र.

## उसाच्या साखरेला बीटच्या साखरेची जोड

खुल्या बाजारांत साखरेच्या किंमती एकसारख्या वाढत चालल्या आहेत. त्यावर नियंत्रण कसे ठेवावे असा कूट प्रश्न उभा राहिला आहे. ह्या परिस्थितीत लवकर सुधारणा होण्याची चिन्हे दिसत नाहीत. कारण, साखरेच्या मागणीत सतत वाढ होत असून त्या मानाने उत्पादन वाढण्याची शक्यता नाही. १९७५ च्या सुमाराला साखरेची मागणी ६० लाख टनांपर्यंत जाईल असा अंदाज करण्यात आला आहे. सध्याचे उत्पादन सुमारे ४० लाख टनाच्या आसपास आहे. म्हणजे, दोन-तीन वर्षातच २० लाख टनाच्या टंचाईला तोंड द्यावे लागणार आहे. साखरेचे उत्पादन वाढण्यासाठी उसाच्या उत्पादनात वाढ करण्यावरच सर्व मदार ठेवणे उचित नाही असा आजवरचा अनुभव आहे. म्हणून उसाच्या जागी किंवा त्याला जोड म्हणून बीट सारख्या दुसऱ्या शर्करायुक्त पिकांचा शोध घेणे अपरिहार्य झाले आहे. साखर देणाऱ्या बीटकंदाविषयी आज जी माहिती उपलब्ध आहे तीवरून ह्या पिकाबाबत बरीच आशा करण्यास जागा आहे. बीटपासून साखर तयार करणाऱ्या बऱ्याच देशांचा अनुभव उत्तेजित करणारा आहे. खरे तर आज जगात साखरेचे जेवढे उत्पादन होते त्यापैकी निम्मे उत्पादन बीटपासून होत आहे. साखर तयार करण्यास उसाचा वापर करण्याऐवजी बीट वापरणे अनेक दृष्टींनी किफायतशीर ठरण्यासारखे आहे. उसाच्या दर एकरी पिकापेक्षा बीटचे उत्पादन जवळजवळ दुप्पट आहे. शिवाय उसाचे पीक वर्षातून एकदाच घेता येते. बीटचे पीक मात्र दरसाल दोनदा घेता येते. त्यामुळे साखरेच्या उत्पादनासाठी लागणाऱ्या कच्च्या मालाच्या पुरवठ्यात चांगली वाढ करता येणे शक्य होईल.

हिंदमधील साखरेच्या धंद्याने बीटचे ह्या दृष्टीने असलेले महत्त्व जाणले आहे आणि बीटपासून साखर तयार करणारे काही कारखाने उभारण्यातही आले आहेत. आणखी काही कारखाने उभारणीच्या वेगवेगळ्या अवस्थेत आहेत. अर्थात ह्या कारखान्यांसाठी जरूर असणारा बीटकंद कसा मिळवावा हा प्रश्न आहेच. हिंदमध्ये बीटची लागवड करण्यास खूप मोठा वाव आहे. परंतु त्याबाबत अद्याप फारसे काही करण्यात आलेले नाही. अगदी अलीकडे नॅशनल सीड्स कॉर्पोरेशन ह्या संघटनेने बीटचे बियाणे व्यापारी प्रमाणावर उत्पादन करण्यास प्रारंभ केला आहे. हिमाचल प्रदेश आणि काश्मीरचे खोरे ह्या भागांत ३ हजार एकरांत बीटचे बियाणे तयार करण्यात येत आहे. ह्या कामात चांगले यशही मिळत आहे. एकदा यशाची खात्री झाली की साखर देणाऱ्या बीटच्या कंदांची लागवड देशात अनेक ठिकाणी करण्यात येईल अशी आशा करण्यास हरकत नाही. ह्यासंबंधी जे संशोधन करण्यात आले आहे त्यावरून असे दिसते की हिमाचल प्रदेश, हरयाणा, पंजाब, जम्मू-काश्मीर, उत्तरप्रदेशाचा मोठा भाग आणि राजस्तानचा उत्तरेकडील भाग ह्या प्रदेशातून साखरेच्या बीटची लागवड करण्यास अनुकूल परिस्थिती आहे. उत्तर भारताप्रमाणे तामीळ नाडूमधील डोंगराळ भागही हवामानाच्या दृष्टीने बीटच्या पिकास पोषक असा आहे. तथापि त्याची लागवड होण्यासाठी सरकार, कारखानदार व व्यापारी ह्यांच्या उत्तेजनाची आवश्यकता आहे. हिंदी शेतकऱ्याला बीटच्या लागवडीची माहिती देऊन ते पीक घेण्यासाठी प्रवृत्त केले पाहिजे. सध्या उसाच्या पिकाचे उत्पादन कमी झाल्यामुळे जी कठीण परिस्थिती उभी ठाकली आहे तिला साखरेच्या बीटकंदाची लागवड हे चोख उत्तर होऊ शकेल.

---

## पुढारलेल्या देशांतूनही बुद्धिमंत बाहेर जातातच

अविकसित देशातून तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ, डॉक्टर्स, इत्यादी बुद्धिमंतांची परदेशांत जाण्याकडे प्रवृत्ती दिसून येते. त्यामुळे त्यांच्या शिक्षणाचा लाभ तिसऱ्याच देशांना होतो. प्रगत आणि म्हणून अधिक सुख-संपन्न देशांतून परागंदा होणारांची संख्या फार नसावी असे वाटते. पण तेही तितकेसे खरे नाही. जगातील शिक्षणाची वाढ व विस्तार ह्याविषयी अहवाल तयार करण्यासाठी संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या सांस्कृतिक उपसंघटनेने एक आंतरराष्ट्रीय समिती नेमली होती. समितीने आपला अहवाल तयार केला असून त्याचा विचार उपसंघटनेच्या परिषदेत करण्यात येणार आहे. ह्या अहवालासाठी जमा करण्यात आलेल्या माहितीवरून असे दिसून आले आहे की बुद्धिमंतांच्या प्रदेशप्रयाणाच्या बाबतीत फक्त अविकसित देशच काय ते चिंताग्रस्त आहेत असे नाही. उलट, काही प्रमुख औद्योगिक देशही ह्या संकटाने बरेच पीडित झालेले आहेत. बुद्धिमंतांची ही निर्यात दोन प्रकारची असते. एक म्हणजे शिकून तयार झालेले तंत्रज्ञ, शास्त्रज्ञ व उच्चशिक्षित लोक ह्या ना त्या कारणासाठी परदेशांत जातात आणि त्यांपैकी बरेच जण तेथेच स्थायिक होण्याची खटपट करतात. परदेशात शिक्षणासाठी जाणारे विद्यार्थीही मायदेशी परत येण्यास

कित्येकदा उत्सुक नसतात, हा दुसरा प्रकार. अविकसित देशांतही सर्वच देश एकाच पातळीवर नसतात. त्यामुळे त्यातल्या त्यात विकसित देशाकडे कमी विकसित झालेल्या देशांतील बुद्धिमंत जाऊ पाहात असतातच.

### भारत व जपान ह्यांचे व्यापारी सहकार्य वाढणार

हिंदचे अर्थमंत्री श्री. यशवंतराव चव्हाण जपानला भेट देऊन आले. ह्या भेटीच्या परिणाम म्हणून उभयता देशांतील आर्थिक सहकार्य वाढण्याची शक्यता आहे. दोन्ही देशांच्या सहकार्याने काही औद्योगिक आणि बाजारपेठेच्या संघटना स्थापन होण्याचा संभव निर्माण झाला आहे. गेल्या २० वर्षांत भारत व जपान ह्यांच्यातील आर्थिक संबंध वाढीस लागलेले आहेत. १९५० च्या दशकापर्यंत उभयता देशांतील आयात व निर्यात ह्यांची वाढ सारख्याच वेगाने होत होती. त्यानंतरच्या १९६० च्या दशकात मात्र जपानकडून आयात करण्यात येणाऱ्या मालात घट झाली आणि जपानला करण्यात येणाऱ्या निर्यातीत सतत वाढ होत गेली. १९७०-७१ मध्ये जपान हा भारताच्या व्यापारी संबंधात ४थ्या क्रमांकाचा देश होता. तो भारताच्या निर्यातीपैकी १३.३ टक्के निर्यात घेत असे आणि भारताला होणाऱ्या आयातीपैकी ५.१ टक्के माल पुरवीत असे. उलटपक्षी भारत मात्र जपानच्या व्यापारी संबंधात १९ व्या क्रमांकाचा देश होता. जपानच्या एकूण आयात व्यापारात भारताची टक्केवारी अवघी १.३ टक्के होती. ह्यावरून जपानला निर्यात होणाऱ्या मालाची वाढ करण्यास किती वाव आहे हे दिसून येते. ज्या मालाच्या उत्पादनात मजुरीला अधिक वाव आहे अशा प्रकारच्या उत्पादनाच्या बाबतीत भारतात पुष्कळ संधी आहे ह्याची जपानला जाणीव आहे. अशीच जाणीव बऱ्याच पाश्चिमात्य देशांनाही झालेली आहे. एखादा उद्योगधंदाच जपानहून भारतात आणण्यास जपानला किती आस्था आहे, किंवा पोलादासारखे उत्पादन करण्याच्या कामी सहकार्य देण्यास तो कितपत तयार आहे ह्यासंबंधी सध्या तरी कल्पना आलेली नाही. पण लवकरच ती मिळू शकेल.

### गरिबांची अधिक संख्या उत्तर प्रदेश व बिहारमध्ये

फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीज ह्या संघटनेने केलेल्या पाहणीप्रमाणे भारतातील गरीब लोकांच्या एकूण संख्येपैकी जास्तीत जास्त गरीब लोक उत्तर प्रदेश आणि बिहार ह्या राज्यांत राहात आहेत. देशात सुमारे २२ कोटी लोक दारिद्र्यापेक्षाही कंगाल अशा अवस्थेत जगत आहेत. त्यापैकी ६.५६ कोटी लोक वरील दोन राज्यांत आहेत. उत्तर प्रदेशातील कंगाल लोकांची संख्या ३.८६ कोटीच्या घरात आहे. आंध्र प्रदेशातील अशा लोकांची संख्या १.७९ कोटी आणि मध्य प्रदेशातील १.८ कोटी अशी आहे. उत्तर प्रदेश, बिहार, आंध्र प्रदेश आणि मध्य प्रदेश ह्या चार राज्यांतून मिळून एकूण लोकसंख्येच्या ५० टक्के लोक कमालीच्या दारिद्र्यात जगत आहेत. सध्याच्या किमती जमेस धरून ज्या लोकांचा दरडोई मासिक खर्च ३७ रुपयांहून कमी आहे त्यांना दरिद्री असे संबोधण्यात आलेले आहे. पाहणीत असे आढळून आले की शहरातील बहुतेक गरीब हे बेकार असतात. त्यांच्यातील बरेच जण ग्रामीण भागांतून कामधंदा मिळविण्यासाठी शहरांत आलेले असतात. ग्रामीण भागांतील दरिद्री लोकांत सर्वांत अधिक भरणा शेतमजुरांचा आणि छोट्या शेतकऱ्यांचा असतो. शेतमजुरांना फक्त शेताच्या हंगामातच काय ते काम मिळते. ग्रामीण भागांतून शहरांत येणाऱ्यांची संख्या बरीच असली तरी ग्रामीण भागांतील बहुसंख्य बेकार आपली गावे सोडून इतरत्र जाण्यास विशेष अनुकूल दिसत नाहीत. पंजाब, हरयाणा, जम्मू-काश्मीर आणि हिमाचल प्रदेश ह्या राज्यांतून दरिद्र्यांची संख्या तुलनेने कमी म्हणजे अनुक्रमे २७ लाख, २४ लाख, २० लाख व १.१ कोटी अशी आहे.


**" अर्था "चा दिवाळी अंक**

" अर्था "चा १९७२ चा दिवाळी अंक नोव्हेंबरच्या पहिल्या आठवड्यात प्रसिद्ध होईल. जाहिरातदारांनी आपल्या जाहिराती सत्वर पाठवाव्या, अशी विनंती आहे.

**द. रा. कुलकर्णी**
जाहिरात व्यवस्थापक,



**" नवभारताच्या उभारणीमध्ये सहकारी चळवळ फार महत्त्वाची भूमिका पार पाडीत आहे. "**
—पं. जवाहरलाल नेहरू

*महाराष्ट्रातील सहकारी चळवळीची प्रेरक शक्ती*

**दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड**

मुख्य कार्यालय : फोर्ट, मुंबई १. मुंबईतील शाखा २१

प्रादेशिक कार्यालय : महाल, नागपूर नागपूरमधील शाखा ५

| | |
|---|---|
| भांडवल व निधी | रु. २१ कोटी |
| ठेवी | रु. १०४ कोटी |
| दिलेली कर्जे | रु. १४९ कोटी |
| खेळते भांडवल | रु. २०५ कोटी |

**सामुदायिक हितासाठी झटणारी आगळी बँक**

## अर्थव्यवस्था धोक्यात असल्याची चिकित्सा

नॅशनल कौन्सिल ऑफ अप्लाइड इकॉनामिक रिसर्च ह्या संघटनेने देशाच्या अर्थव्यवस्थेची पाहणी केली आह. पाहणीवरून असा निष्कर्ष काढण्यात आला आहे की राष्ट्रीय अर्थव्यवस्थेचा गाडा जवळ जवळ रुतून बसल्यासारखा झाला आहे. राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होण्याचे थांबले असून चालू आथक वर्षात किमतीवरील दाब मात्र अधिक वाढत चालला आहे. ह्या वर्षी औद्योगिक विकास ९ ते १० टक्के होईल अशी आशा करणे शक्य वाटत नाही. औद्योगिक विकास इतका तर राहोच पण ६ अगर ७ टक्के झाला तरीही समाधान मानावे लागेल अशी चिन्हे दिसत आहेत. अर्थव्यवस्थेवर चलनवृद्धीचे जे दडपण आले आहे त्याला समर्थपणे तोंड देण्यासाठी विकासाचा हा वेग पुरा पडण्यासारखा नाही. शेतीचे उत्पादन गेल्या वर्षापेक्षा कमी येण्याचा संभव आहे. १९७२–७३ सालात अन्नधान्याचे उत्पादन १९७१–७२ सालाशी तुलना करता २० ते ३० लाख टनांनी कमी येईल असं दिसते. हे उत्पादन सुमारे १०·६ कोटी टनांच्या जवळपास असेल. परंतु खुद्द हेच उत्पादन १९७०–७१ च्या मानाने २० लाख टनांनी कमी आहे. साखरेच्या उत्पादनासाठी कितीही प्रलोभने दाखविण्यात आली असली तरी चालू हंगामात साखर ३७ लाख टनांपेक्षा अधिक होईलसे वाटत नाही. म्हणजे उत्पादन देशांतील गरज जेमतेम भागविण्याइतकेच होईल. तेलबियांचे उत्पादन तर बेताचेच होणार आहे. एकंदरीने जीवनावश्यक वस्तूंच्या उत्पादनात बरीच घट येणार असल्याने किमती खाली येण्याचे राहोच; पण त्या स्थिरावण्यासाठी परिस्थिती अनुकूल नाही. उलट ती आणखी खाली जाण्याचीच भीती आहे.

औद्योगिक विभागाकडे वळून पाहता असे दिसते की १९७२ साली उत्पादन खंडित होऊन थांबण्याकडे प्रवृत्ती दिसत आहे. गेल्या काही वर्षात कधीही नव्हता इतका कमी म्हणजे ३·१ टक्के एवढाच वाढीचा वेग दिसून येतो. गेल्या वर्षापासून औद्योगिक आघाडीवर आशेचे किरण फाकू लागले होते; पण आता त्यांची जागा ढगाळ हवेने घेतली आहे. औद्योगिक वाढीच्या दिशने आत्मविश्वासपूर्वक पावले अजून पडू लागलेली नाहीत. उत्पादनाच्या प्रक्रियेत अनेक अडथळे उत्पन्न झाले आहेत. मालक-मजूर संबंध अनिश्चित आणि अशांत आहेत. रेल्वेच्या वाहतुकीवर फार ताण पडल्याने ती करकरू लागली आहे. खाणीपासून काढलेला कोळसा लवकर हलविण्यात न आल्याने कोळशाचे ढिगारे कमी होत नाहीत आणि उलट कोळसा उपलब्ध असून उद्योगधंद्यांना तो वेळेवर पोचविणे शक्य झालेले नाही. विजेच्या पुरवठ्यात अधिकाधिक व्यत्यय येऊ लागले आहत आणि त्यांची व्याप्तीही वाढत चालली आहे. सामान्य माणसाच्या जीवनावर अन्नधान्याच्या वाढत्या किमतीने वाईट परिणाम झाला आहे. किमती वाढण्याच्या टकेवारीने त्याची नीटशी कल्पना येत नाही. गेल्या वर्षीची ह्या वेळची परिस्थिती पाहता किमतीत ८·५ टक्केच वाढ झालेली दिसली तरी काही अन्नधान्यांच्या किमती १४ टक्यांनी वाढल्या आहेत. मासे, अंडी व मांस ह्यांच्या किमती तर ३५ टक्यांनी चढल्या आहेत. साखर ४० टक्यांनी वाढली आहे. किमती वाढण्याच्या ह्या प्रवृत्तीचे मूळ कारण पैशाच्या पुरवठ्यात झालेली अनाकलनीय वाढ हे आहे. पैशाचा पुरवठा भरमसाट झाला असून ह्या पूर्वी तो इतक्या मोठ्या प्रमाणावर वाढल्याचे दिसत नाही.

---

## धंदेवाईक वेश्यांच्या जागी हौशी वेश्या

जगातील वेश्याव्यवसाय नष्ट करण्याचे प्रयत्न करणाऱ्या आंतरराष्ट्रीय संघटनेची २५ वी बैठक दिल्ली येथे भरविण्यात आली होती. कॉंग्रेसच्या बैठकींत वेश्याव्यवसायाच्या सद्यः परिस्थितीविषयी अनेक तज्ज्ञांनी आपले विचार व्यक्त केले. जगात एकंदरीने नीतिमत्ता ढासळत चालली असून स्वैराचाराला प्रोत्साहन देण्यात आल्याबद्दल चिंता व्यक्त करण्यात आली. नैतिक मूल्यांची जी घसरगुंडी होत आहे त्याबद्दल दारू, अमली पदार्थ आणि बीभत्स वाङ्मय ह्यांच्या प्रसाराला दोष देण्यात आला. कॉंग्रेसच्या मताने जगात कुटुंबसंस्था दुबळ होत चालली आहे. धंदेवाईक वेश्यांची जागा नव्या हौशी वेश्या घेत आहेत. ही घटना फार अर्थपूर्ण आहे. कारण आजचा जमाना व्यक्तीने मन मानेल त्या प्रमाणे वागण्याचा आहे. ह्या नव्या जमान्यात वेश्याव्यवसाय नष्ट होण्याची शक्यता आहे. पण त्याची कारणे अनिर्बंध प्रेमसंबंध आणि खालावलेली नैतिक मूल्ये ही असतील. गर्भनिरोध करणारी गोळी आणि लूप ह्यांच्या वापरामुळे स्त्री ही गर्भधारणेच्या धोक्यापासून पूर्णपणे मुक्त होत चालली आहे आणि होत आहे. त्यामुळे पुरुषाच्या बरोबरीने सुरत क्रीडा उपभोगण्याचे स्वातंत्र्य तिला लाभत आहे. तथापि गर्भनिरोधाची ही साधने गुप्त रोगांपासून स्त्री-पुरुषांचा बचाव करू शकतीलच असे नाही. म्हणून सरकारांनी ह्या रोगांपासून मुक्ततेची मोहीम काढण्यात मदत केली पाहिजे. भारताचे अटर्नी जनरल श्री. निरन् डे ह्यांनी अखेरच्या दिवशी भाषण केले. ते म्हणाले की वेश्याव्यवसाय नाहीसा करता येण्यासारखा आह परंतु त्यासाठी स्त्री-पुरुषांना पूर्ण रोजगार देण्यात आला पाहिजे. रोजगार मिळाल्यास वेश्याव्यवसायाची आर्थिक प्रेरणा नष्ट होईल.

---

**सहकारी साखरकारखाना चाललाच नाही** – मध्य-प्रदेशातील मोरेना जिल्ह्यात एक सहकारी साखरकारखाना उभारण्याची खटपट ५ वर्षांपूर्वी झाली होती. कारखान्यासाठी २·६२ कोटी रुपये खर्च झाला. पण चंबळेच्या पाण्याने ऊस पिकविण्याची योजना बारगळली आहे आणि कारखाना एकदा १५ दिवस चालून बंद झाला. तो रतलामला नेण्याचे घाटत होते. पण यंत्रसामग्री वाहून नेण्याचे काम फार खर्चाचे म्हणून सोडून देण्यात आले.

## विमानवाहतुकीत बोकाळलेला भ्रष्टाचार

जगातील बहुतेक सर्व विमान कंपन्या बेकायदा व्यवहार करतात, असे न्यूयॉर्क टाइम्सने प्रसिद्ध केले आहे. 'एरोफ्लोट' ही रशियन एअरलाइन परवापर्यंत न्यूयॉर्क ते पॅरिस आणि न्यूयॉर्क ते मॉस्को ह्या प्रवासाची तिकिटे न्यूयॉर्क येथील एजंटांना ठराविक दरापेक्षा ६५% कमी किमतीला देत होती. कित्येक एअरलाइन्स नव्याने स्थापन झालेल्या प्रवास एजन्सीजना हाताशी धरतात. एका सुप्रसिद्ध अमेरिकन एअरलाइनने गेल्या उन्हाळ्यात किमान ८०० मुलकी उतारूंची न्यूयॉर्क आणि युरोप ह्यांचे दरम्यान वाहतूक केली, तेव्हा त्यांना खास लष्करी सवलतीचा दर आकारण्यात आला. दुसऱ्या एका अमेरिकन एअरलाइनने १,००० उतारूंना न्यूयॉर्क-युरोपचा प्रवास ठराविक दरापेक्षा २,००० रु. कमी घेऊन घडविला.

वयात आलेल्या उतारूंना तरुणांना मिळणाऱ्या सवलती देणे, प्रवास एजन्सीच्या लोकांकडून १,२०० ते ६०० रुपये रोख घेऊन उतारूंना तिकीट न देताच विमानातून नेणे, इत्यादी भ्रष्टाचारांचे इतर प्रकार आहेत.

---

## दारू-बाटलीमुळे झालेला भीषण रेल्वे अपघात

मेक्सिकोच्या उत्तर भागात नुकताच एक भीषण रेल्वे अपघात झाला. ह्या अपघातात गाडी रुळावरून घसरल्यामुळे १८९ लोक ठार आणि हजारावर जखमी झाले. रेल्वेतील प्रवासी मजा करण्यासाठी एका जत्रेला गेले होते. तेथून परत येताना हा अपघात झाला. आता ह्या अपघाताची पोलिसमार्फत चौकशी करण्यात येत आहे. मजा लुटण्यासाठी प्रवास करणारांची मनोवृत्ती गाडीच्या ड्रायव्हरपर्यंत पोचल्याचे तपासात आढळून आले. एंजिन हाकणारे सर्वच मदिरेच्या आधीन झालेले होते. इतकेच नव्हे तर त्यांनी आपल्याबरोबर एंजिनात तीन तरुणीही घेतल्या होत्या. सर्वांनी दारूचा मनसोक्त आस्वाद घेतल्यावर मग ते एंजिनात चढले होते. ह्या तरुणींनी रेल्वेची तिकिटे काढलेली नव्हती. एक तरुणी अपघातात संपली, दुसऱ्या दोघी बेपत्ता आहेत.

---

## विवाहाचे शिक्षण देणारी शाळा

पूर्व जर्मनीच्या सरकारने विवाह करू इच्छिणाऱ्या तरुण-तरुणींसाठी एक शाळा काढली आहे. जीवनातील ही उडी घेण्यापूर्वी त्यांना विवाहाविषयी संपूर्ण माहिती देण्याचा शाळेचा उद्देश आहे. निराशा व भांडणे टाळण्यासाठी अभ्यासक्रमात प्रथम धडे देण्यात येतात. त्याशिवाय संबंधित विषयावर अनेक तज्ज्ञांची व्याख्याने ठेवण्यात येतात. त्यात न्यायाधीश, स्त्री रोगतज्ज्ञ, घराची सजावट करणारे कलावंत, सौंदर्यवर्धनशास्त्रज्ञ, संसाराचे अर्थशास्त्र शिकविणारा प्राध्यापक आणि समाजशास्त्रज्ञ इतक्यांचा समावेश आहे. लैंगिक स्नेह आणि प्रेम ह्यांच्यासंबंधी स्त्री रोगतज्ज्ञ आणि मानसशास्त्रज्ञ उत्तरे देतात. त्यांना प्रश्न विचारणारांनी स्वतःची नावे देण्याची गरज नसते. पूर्व जर्मनीतील अशा प्रकारची ही पहिलीच शाळा आहे.

---

## पाकिस्तानला चीनची प्रचंड शस्त्रास्त्र मदत

अमेरिकेच्या गुप्त हेरखात्याने मिळविलेल्या माहितीप्रमाणे १९६५ मध्ये झालेल्या पाकिस्तान-भारत युद्धापासून ते १९७१ च्या युद्धापर्यंत चीनने पाकिस्तानला २० कोटी डॉलर्स किमतीची शस्त्रसामग्री पुरविली. त्यापैकी ४.५ कोटी डॉलर्सची शस्त्रास्त्रे गेल्या साली मिळालेली आहेत. १९५४ ते १९७१ ह्या काळात चीनकडून बिगर कम्युनिस्ट देशांना शस्त्रसामग्रीच्या रूपाने सुमारे ३५ कोटी डॉलर्सची मदत मिळाली. हे सर्व देश अविकसित अवस्थेत आहेत. ह्याच काळात रशियाने ८०० कोटी डॉलर्सची शस्त्रास्त्रे परदेशांना मदतीदाखल दिली. चीनकडून परदेशांना मिळालेल्या आर्थिक मदतीची रक्कम २२० कोटींच्या घरात आहे तर रशियाकडून मिळालेल्या मदतीची रक्कम ७३० कोटी डॉलर्सच्या जवळपास आहे.

---

## बांधकामात प्लॅस्टिकचा वापर करता येईल

इमारती व घरे बांधण्याच्या कामी प्लॅस्टिकचा वापर कितपत व कसा करता येईल ह्या विषयाचा विचार करण्यासाठी दिल्ली येथे एक तांत्रिक परिषद भरविण्यात आली होती. परिषदेत भाग घेण्यासाठी आलेल्या तज्ज्ञांनी असा अभिप्राय व्यक्त केला आहे की, हिंदमधील बांधकामाच्या धंद्यात प्लॅस्टिकच्या वस्तूंना खूप चांगला भविष्यकाळ आहे. प्लॅस्टिकच्या वस्तूंचा वापर केला तर लोखंड व पोलाद वापरल्यामुळे बांधकामाची दुरुस्ती व डागडुजी करण्यासाठी वारंवार येणाऱ्या खर्चातही बचत होऊ शकेल. इमारतीसाठी सध्या वापरण्यात येणाऱ्या अनेक प्रकारच्या मालाची जागा प्लॅस्टिकचा माल घेऊ शकेल. त्यामुळे लोखंड, पोलाद, विटा, सिमेंट इत्यादींची मागणीही कमी होऊ शकेल. भारतात प्लॅस्टिकसाठी लागणाऱ्या कच्च्या मालाचे उत्पादन २ लाख, १० हजार टनांच्या आसपास होते. लवकरच ते २ लाख ६० हजार टनांच्या घरात जाण्याची शक्यता आहे. देशात बांधकामासाठी जरूर असणाऱ्या नेहमीच्या मालाचा तुटवडा भासत आहे. घरांची टंचाई भागविण्यासाठी घरबांधणीचे कार्यक्रम मोठ्या प्रमाणावर हाती घ्यावे लागणार आहेत. तेव्हा नवीन घर बांधणीत प्लॅस्टिकचे नळ, पाण्याच्या टाक्या, धुता येण्यासारखे हौद, जिने, सजावट करण्याच्या वस्तू, इत्यादी मालाचा वापर करावा लागेल. संरक्षणासाठी लागणारा काही मालही प्लॅस्टिकचा बनविता येतो. भारतामध्ये आता पेट्रोकेमिकल धंदा विस्तारत चालला आहे, हे लक्षात घेऊन संयुक्त राष्ट्र संघटनेच्या विकास कार्यक्रमातर्फे भारताला १० लाख डॉलर्सची मदत देण्यात आली आहे. हिंदच्या बांधकामाच्या धंद्यात प्लॅस्टिकच्या उपयोगाची शक्यता अजमावण्यासाठी ह्या रकमेचा उपयोग करावयाचा आहे.

# वरदहस्त

" परिहास विजल्पितं सखे परमार्थेन न च गृह्यतां वचः
बदलो थट्टेने ते सारे खरे न मानी ".
— शाकुंतल

लेखक : विजय गोखले

एका सिनेमागृहाचे उद्घाटन होते. खास निमंत्रण, ते सुद्धा मित्राचे; मग जाणे भागच होते. मन मात्र विचारांत गुंग झाले होते. कॉलेजात आम्ही पुढील बाकावरील पण नोकरदारीत स्वभावाने मागील बाकावरील ठरलो होतो, तर आमचा हा मागील बाकावरील दोस्त जीवनात पुढील बाकावरील ठरला होता. कारण साधे आणि सरळ होते. मंत्रीसाहेबांचा तो नातेवाईक होता; मग काय सत्तेचा वरदहस्त त्याच्या डोक्यावर असल्यास नवल नाही. वर्गात बंड्या म्हणून हा बंडखोर टोळीतच सदा असावयाचा आणि बसावयाचा, पण आज मात्र त्याच्या सिनेमागृहाचे उद्घाटनाला गेल्यावर त्याला बंडोपंत म्हणणे भागच होते, तो एक शिष्टाचाराचा भाग होता. पण बंडोपंत हे नावही त्याला आता आवडायचे नाही. तो बाळासाहेब म्हणून घेण्यात सुखावत होता.

विद्यालयीन, महाविद्यालयीन जीवनात असे बंडू, पांडू, चिंतू किंवा मुलींच्या यादीत नमी, माली, वच्छी हे कोणी ना कोणीतरी डोकावतात. पुढे त्यांच्या नावावर साहेब, पंत, ताई, देवी ही विशेषणे लागतात; काही स्वकर्तृत्वामुळे तर काहींच्या नातेवाइकांच्या कीर्तीमुळे, मेहेरनजरेमुळे !

'पंत मेले, राव चढले'. पूर्वी नोकरी करावी तर सरकारीच. अठरा वर्षांचा मॅट्रिक झालेला पोरसवदा हा बाबू कारकुनीतून उतारवयात बाबूराव होत असे. इच्छा असो वा नसो एक स्केल संपले की ई. बी.— दुसरे स्केल, मध्येच डिपार्टमेंटची परीक्षा मग श्रेणीत बदल, पुन्हा ई. बी. वगैरे वगैरे. हा सर्व मामला त्याचा त्या खात्यातील चिकाटीने टिकून राहण्याचा व अनुभवाचा असे हे निश्चितच ! पूर्वीच्या काळी वाडवडिलांपासून चालत आलेली नोकरी मुलगा पुढे चालवत असे. हो ! एक नोकरी धरावी ती पेन्शन घेऊन सोडावी आणि वर आपल्या मुलाला चिकटवूनच. त्या काळात खाजगी नोकरी करणे हे निषिद्धच असे; अन् शिवाय अशा नोकरीत सरकारी नोकरीची शान, इतमाम नसावयाचा ! अशा नोकराला लग्नाच्या बाजारात किंमत नव्हती हे ओघाने आलेच.

पण जगच बदलले. स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिक धंदे वाढले. सरकार दरबारचे मंत्री पण वाढले. त्या प्रमाणात नाही, व्यस्तच प्रमाणात नोकरशाही वाढली. स्वकर्तृत्वामुळे मिळविलेल्या सत्तेचा उपयोग हा स्वतःपुरता मर्यादित न राहता नातेवाईक मंडळींना अधिकाराच्या जागा देण्यात येऊन पसरला. मग नातेवाईक व्यक्तीला कामाची माहिती, आवड, चिकाटी, कर्तृत्व असो वा नसो, त्याच्यासाठी खास जागा निर्माण करून तो त्या पदावर आरूढ व्हावयाचा हे ठरल्यागतच असे. दुसरा वर्ग मोडतो तो खुषमस्कऱ्यांचा ! साहेबाला काय पाहिजे हे ओळखणारा, आपण काही न करता मी करतो, हे करावयाला पाहिजे, असे म्हणणारा वर्ग तर आज प्रकर्षाने सत्तेवर तेजाने तळपत आहे. साहेबाच्या स्तुतिव्यतिरिक्त, ह्या वर्गाचा विशेष असा की निर्लज्जपणा, शिव्या खाण्याची तयारी, बेमालूम खोटे बोलण्याची कला, ढोंगी ( आपमतलबी ) स्वामिभक्ती हे जर जमले तर सोन्याहून पिवळे ! आमच्या निळकंठराव गोडबोल्यांचेच बघा ना ! साहेब, साहेब करत हा गृहस्थ साहेबाच्या खोलीभोवती गोंडा घोळत, किंवा अजगरासारखा त्या खोलीला विळखा घालून बसलेला कोणाला केव्हाही दिसेल. कोणतेही काम तुम्ही त्याला सांगा. स्वभावाने तो तुम्हाला नाही म्हणावयाचा नाही, पण करावयाचा नाही, ही काळ्या दगडावरील रेघ समजून असा. मात्र तेच काम साहेबांनी सांगू दे. हा जगभर डंका पिटत 'साहेबाचे काम आहे' म्हणून सगळ्यांना राबवून घेईल आणि मी केले म्हणून शेखी मिरवेल. पुन्हा त्याचा दबदबा काही विचारूच नका ! हो, साहेबाचा खास पिट्टू; काम किरकोळ असो नाहीतर अत्यंत महत्त्वाचे असो—गोडबोल्यांनी केलें तरच ते काम होणार म्हणून समजा ! इतरांनी जिवापाड श्रमून काम केले तर हे गृहस्थ चारचौघांत, त्यात विशेष काय आहे, किंवा त्याचेच काम होते, ह्याहीपेक्षा लवकर करावयास पाहिजे होते, असं म्हणावयास कमी करणार नाही.

यशवंतरावांनी एखादा फडतूस जोक केला तर जमलेली मंडळी हसावयासच पाहिजेत; ते खुर्चीवर आहेत ना ! किंवा शंकररावांनी आपल्या परदेशदौऱ्याचे बेचव वर्णन छापून आणले तर वा, काय ते प्रवासवर्णन ! प्रवासवर्णन लिहावे तर शंकररावांनीच !! बाळासाहेबांना ऑफिस आठ वाजता असते हे माहिती नाही का ? पण ते कधीही दहा वाजेपर्यंत उगवणार नाहीत—आणि उगवलेच तर पहिले नमन ( दर्शन ) वरिष्ठांकडे; मगच जागेवर जाणार ! त्यानंतर दिवसभरात काहीही काम केले नाही तरी चालेल. अशा भाग्यशाली लोकांचा पगार, इतर सुखसोयींचा वाढता आलेख, कामावर कधीच अवलंबून नसतो. इतकेच काय, जरी शंभर गुन्हे झाले तरी सहज पचवले जातील मग ते कितीही मोठे असोत. हे सर्व साहेबाचा वरदहस्त आहे तोपर्यंतच हं !

काम करी दाम हे आता विसरावयास पाहिजे. नुसते कष्ट करून तुम्ही कामकरीच राहणार. जर का वरिष्ठ जागी पोहचावयाचे असेल किंवा विनासायास सुखोपभोग घ्यावयाचा असेल तर एकतर तुम्ही मंत्र्याचे, उद्योगपतीचे कशाही प्रकारे नातेवाईक म्हणून जन्मास यावयास पाहिजे, व ती शक्यता नसेल तर बेमालूम हांजी हांजी करता यावयास पाहिजे. खुषमस्करीपणा करावयास जमणे हे आजच्या जगातील सुखी होण्याचे आद्य साधन आहे—मग ह्या जगात तुमच्यासारखा दुसरा कोणीच भाग्यवान ठरणार नाही !

## १९७३ मधील बँकांच्या सुट्ट्या

महाराष्ट्र सरकारने नि. इं. ॲक्ट खाली जाहीर केलेल्या सार्वजनिक सुट्ट्या खालीलप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १६ | जानेवारी | बकरीद |
| २६ | ,, | प्रजासत्ताकदिन |
| १४ | फेब्रुवारी | मोहरम |
| १९ | मार्च | होळी |
| ४ | एप्रिल | गुढीपाडवा |
| १६ | ,, | ईद |
| २० | ,, | गुडफायडे |
| १ | मे | महाराष्ट्रदिन |
| १७ | ,, | बुद्धजयंती |
| १५ | ऑगस्ट | स्वातंत्र्यदिन |
| २८ | ,, | पार्शी वर्षारंभ |
| ३१ | ,, | गणेशचतुर्थी |
| ६ | ऑक्टोबर | दसरा |
| २६ | ,, | दिवाळी (अमावास्या) |
| २७ | ,, | ,, (प्रतिपदा) |
| २५ | डिसेंबर | नाताळ |

## मुलांना पोहण्यास शिकवा

जागतिक आरोग्य संघटनेने प्रसिद्ध केलेल्या अहवालात अशी सूचना करण्यात आली आहे की मुलांना पाण्यात बुडून होणारा अपघात होऊ नये म्हणून सर्व मुलांना पोहण्यास शिकविण्यात यावे. त्यात अशी माहिती देण्यात आली आहे की माणूस व व माकड हे दोन प्राणी सोडून इतर सस्तन प्राण्यांची प्रजा उपजतच पाण्यात पोहू शकते. त्यामुळे पाण्यात बुडून होणारे मृत्यू सर्व जगभर घडत असतात. भारतात दरसाल सुमारे ३० हजार लोक निरनिराळया कारणांनी बुडून मरतात. त्यांपैकी ४ वर्षाखालील १० हजार तरी मुले असतात. अमेरिकेत ४ वर्षाखालील ७ हजार मुले बुडून मृत्युमुखी पडतात. अमरिकेत फ्लोरिडा व कॅलिफोर्निआतील बहुतेक मोठ्या शहरातून लहान मुलांना पोहण्यास शिकविण्याचे वर्ग काढण्यात आले आहेत. आता ही कल्पना युरोपमध्येही पसरली आहे.

## परदेशी चलनात होटेलची बिले द्या

भारतात येणाऱ्या परदेशी उतारूंना परदेशी चलनातच होटेलची बिले देण्यास प्रोत्साहन देण्यासाठी, जे उतारू रुपये देऊ इच्छितील त्यांना ३३⅓% जास्त रकम द्यावी लागेल, असे ठरविले आहे. चार आणि पाच स्टार होटेल्समध्ये उतरणाऱ्या भारतीयांनाही ३३⅓% भुर्दंड द्यावा लागेल. विमानतळावर आणि होटेलांच्या प्रवेशद्वाराशी अधिकृत दरापेक्षा जास्त रुपये देणारे लोक उतारूंना गराडा घालतात, त्यामुळे भारताचा दुर्लौकिक होतो. तो ह्यामुळे टळेल आणि भारताचे परदेशी चलनाचे उत्पन्नही २ ते ३ कोटी रुपयांनी वाढेल. हे नियम १ नोव्हेंबर पासून अमलात येतील.

## माजी पंतप्रधान आणि आजी फॉरिन सेक्रेटरी ह्यूम ह्यांची एम्ब्रॉयडरी

लंडन येथे नुकतेच "सेव्ह दि चिल्ड्रेन फंडा" साठी एक प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्यातील एका चेअर कव्हरने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. ह्या कव्हरच्या एम्ब्रॉयडरीचे काम ग्रेट ब्रिटनचे भूतपूर्व पंतप्रधान आणि सध्याचे फॉरिन सेक्रेटरी सर ॲलेक डग्लस ह्यूम ह्यांनी केलेले होते! ३० वर्षांपूर्वी त्यांना मज्जा-रज्जूच्या क्षयबाधेमुळे दोन वर्षे अंथरुणावर पडून राहावे लागले, त्यांना फक्त हातांचा वापर करता येई. "दिवसभर वाचणे शक्य नाही आणि दिवसभर बोलणेही शक्य नाही; तेव्हा मी एम्ब्रॉयडरी शिकलो," अशी त्यांच्या छंदाची त्यांनी पूर्वपीठिका सांगितली. "बहुतेक लोक गुडघ्यांवर काम करतात; मी डोक्यावर धरून एम्ब्रॉयडरी केली. त्याकडे चोखंदळपणे पाहू नका; नाइलाजाचा तो छंद होता," असेही ते म्हणाले.

सर ॲलेक ह्यूमनी दहा चेअर कव्हर्स आणि पिॲनो स्टूलसाठी आणखी एक कव्हर, अशा ११ कलाकृती केल्या.

## हृदयविकाराच्या रोग्यांना दिलासा

गणकयंत्र आणि उपग्रह हे शब्द उच्चारले की सामान्य माणसाच्या जीवनाशी काही संबंध नसलेल्या शास्त्रीय ज्ञानाचा व शोधाचा बोधच बहुधा होतो. पण शास्त्र हे काही आता असे त्रयस्थ राहिलेले नाही. अनेक शास्त्रीय शोधांचा आपण हरघडी वापर करतो व करू लागणार आहो. जर्मनीमधील शास्त्रज्ञांनी हृदयविकाराविषयी तत्काळ माहिती देणारे व रोग्याला सावध करणारे एक छोटे यंत्र तयार केले आहे. ते कोटाच्या खिशात राहाण्याइतके लहान असून त्यात गणकयंत्र व अवकाशशास्त्र ह्यातील अद्ययावत माहितीचा उपयोग करून घेण्यात आला आहे. हे यंत्र जवळ बाळगले की रोग्याला हृदयाचे ठोके फार जलद पडत आहेत किंवा फार संथ पडत आहेत ह्याचे तत्काळ ज्ञान होते. ठोके अनियमित पडत असल्यासही यंत्र इशारा देते. ह्या यंत्राच्या वापरामुळे पश्चिम जर्मनीत दरसाल १ लाख, ६० हजार हृदयविकाराचे रोगी वाचतात.

**सर्कशींना प्रॉ. फंड कायदा नको—** मध्यवर्ती सरकारने १९६३ मध्ये एक नोटिफिकेशन काढून सर्कस कंपन्यांना प्रॉव्हिडंट फंड कायद्याच्या कक्षेत आणले. ही नोटिफिकेशन घटनाबाह्य आहे, कारण संघटित खेळ आणि करमणूक ह्या स्वरूपाचा आपला धंदा आहे, हे सर्कसवाल्यांचे म्हणणे दिल्ली हायकोर्टाने अमान्य केले. त्यावर सुप्रीम कोर्टाकडे अपील करण्यास सुप्रीम कोर्टाच्या डिव्हिजन बेंचने मान्यता दिली आहे.

**फुटबॉलपटूला ४० लक्ष रुपये—** लंडनच्या आर्सेनल फुटबॉल क्लबाने ब्लॉकले ह्या खेळाडूपटूला एका वर्षासाठी ४० लक्ष रु. देण्याचा त्याच्याशी करार केला आहे.

### महाराष्ट्र स्टेट को. बँकेचे अध्यक्ष श्री. नी. श्री. सपकाळ वॉर्सॉकडे


महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेचे अध्यक्ष श्री. नी. श्री. सपकाळ हे दिल्ली येथील नॅशनल फेडरेशन ऑफ को-ऑपरेटिव्ह शुगर फॅक्टरीज लिमिटेडचे प्रतिनिधी म्हणून इंटरनॅशनल को-ऑपरेटिव्ह अलायन्सच्या पंचविसाव्या काँग्रेसला उपस्थित राहण्यासाठी म्हणून दि. १–१०–१९७२ रोजी वॉर्सॉला रवाना झाले. ह्या परदेशवारीत ते 'ग्रीन-लीफ प्रोटीन', 'वायनरीज्', 'ट्रॅक्टर निर्मिती' वगैरे प्रकल्पांबाबत पोलंड, हंगेरी, डेन्मार्क, फ्रान्स, इटली, आदी युरोपीय राष्ट्रांकडून तांत्रिक सहयोग मिळविणे कितपत शक्य होऊ शकेल याचाही अंदाज घेणार आहेत. महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेच्या सहकारी उद्योग मंडळाच्या विद्यमाने सहकारी क्षेत्रात वरील प्रकल्पांची उभारणी होत आहे. ते या महिनाअखेरीस मुंबईस परततील.

### दूरचित्रवाणीमुळे सिनेमावर परिणाम होणार नाही ?

मुंबईत दूरचित्रवाणीच्या कार्यक्रमास नुकताच प्रारंभ झाला आहे. जनमानसापर्यंत पोचण्याच्या ह्या समर्थ साधनाचा लोकांवर काय परिणाम होईल हे आताच सांगता येणार नाही. चित्रवाणीवर बोलपट दाखविण्यात येऊ लागले तर सिनेमाला जाणाऱ्या लोकांची गर्दी कमी होऊ लागेल असा एक समज आहे. पण भारत सरकारच्या माहिती व नभोवाणीखात्याचे मंत्री श्री. गुजराल ह्यांना तसे वाटत नाही. त्यांच्या मताप्रमाणे भारतात सिनेगृहे असावीत तितकी नाहीत. तेव्हा बोलपटांना धोका पोचण्याचे कारण नाही. उलट ज्या लोकांना आजपर्यंत बोलपट पाहाण्याची फारशी संधी मिळालेली नाही तेही लोक दूरचित्रवाणीच्या पडद्यावर चित्रपट पाहू लागतील. विविध भारतीवर फिल्मी संगीत लावल्याने ध्वनिमुद्रिकांच्या खपावर परिणाम होईल असे वाटत होते. पण तसे झाले नाही, हे उदाहरण त्यांनी दिले.

### तिसरी आशिआ आंतरराष्ट्रीय व्यापारी जत्रा

नोव्हेंबर महिन्याच्या तीन तारखेपासून दिल्ली येथे तिसरी आशिआ आंतरराष्ट्रीय व्यापारी जत्रा सुरू होणार आहे. ह्या जत्रेपासून सुमारे ५० कोटी रुपयांचे उत्पन्न होईल अशी अपेक्षा आहे. त्यातील ८ कोटी रुपये परदेशीय चलनातील असतील. जत्रा भरविण्यासाठी तयार करण्यात येत असलेल्या जागेसाठी ६ कोटी रुपये खर्च होणार आहे. जत्रेसाठी उभारण्यात येणारी काही बांधकामे कायम स्वरूपाची आहेत. त्यात पोलाद व काँक्रीट ह्यांनी बनविलेल्या दोन भव्य वास्तू आहेत. जत्रेच्या आवारात एक सुती कापड केंद्र, एक सिनेमागृह आणि एक ग्रामीण भारताचे दर्शन घडविणारे केंद्र आहे. प्रदर्शनात ४७ परदेश भाग घेतील. त्याशिवाय बहुतेक राज्य सरकारे, बरेच खाजगी उद्योगधंदे आणि सार्वजनिक मालकीचे उद्योगधंदे भाग घेतील.







हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं.९१५/१ आर्यभूषण छापखान्यात, या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२१ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. (वार्षिक वर्गणी रु. ६)